2 4 AUG 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडामहर्षी नागेशकर चषकाचा 'शहाजी' उपविजेता

## पंचवीस हजारांचा धनादेश देऊन गौरव; शिवाजी विद्यापीठात आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठाच्या २०२३-२४ च्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर चषकाचे उपविजेतेपद मिळवले. याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते महाविद्यालयाला चषक, २५ हजार रुपयांचा धनादेश देऊन गौरवले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते महाविद्यालयाला गौरवताना उपस्थित मान्यवर.

प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, जिमखाना प्रमुख कॅप्टन डॉ. प्रशांत पाटील यांचा विद्यापीठात गौरव केला. श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, प्रशासन अधिकारी मनीष भोसले यांनी अभिनंदन केले. शैक्षणिक वर्षात ३६ खेळाडूंनी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवला. तसेच अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत पॉवर लिफ्टिंगमध्ये ऋतुराज पाटील सुवर्ण, कयाकिंगमध्ये धनश्री धोकटे रौप्य, स्विमिंगमध्ये पृथ्वीराज डांगे कास्यपदक मिळवले. फुटबॉल पुरुष, बेसबॉल सॉफ्टबॉल पुरुष, हॉकी महिला, क्रिकेट महिला खेळामध्ये शिवाजी विद्यापीठस्तरावर चॅम्पियनशिप पटकावली. दोनशेहून अधिक खेळाडूंनी वर्षभरात शिवाजी विद्यापीठ विभागीय आणि आंतरविभागीय स्पर्धेत सहभाग नोंदविला. प्रबंधक रवींद्र भोसले यांचे खेळाडूंना मार्गदर्शन मिळाले. कनिष्ठ विभागातील क्रीडा प्रशिक्षक प्रा. प्रशांत मोटे, विजय लाड, खेळाडू उपस्थित होते.

2 4 AUG 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडामहर्षी नागेशकर चषकाचे न्यू कॉलेज सातव्यांदा मानकरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२३-२४ साठीचा क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्कार कोल्हापूर येथील दि न्यू कॉलेजने पटकावला. या कॉलेजने सर्वाधिक १०५२ गुण प्राप्त करीत सलग सातव्या वर्षी मेघनाथ नागेशकर फिरता चषक, कायमस्वरूपी चषक, प्रमाणपत्र आणि रोख ५० हजार रुपयांचे पारितोषिक मिळवले.


प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी स्वीकारले. यावेळी डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या पुरस्कारांचे वितरण कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी कोल्हापूर येथील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाने ६३४ गुण प्राप्त करीत द्वितीय क्रमांकाचा चषक, रोख २५ हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले. तर, गडहिंग्लज येथील शिवराज महाविद्यालय साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालयाने ५२४ गुणांसह तृतीय क्रमांकाचा चषक, रोख १५ हजारचे पारितोषिक प्राप्त केले. प्राचार्य डॉ. व्ही.एम. पाटील, डॉ. आर. के. शानेदिवाण आणि डॉ. अनिल कुराडे यांनी अनुक्रमे तिन्ही क्रमांकांच्या पारितोषिकांचा स्वीकार केला. डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. किरण पाटील यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. ज्योती जाधव, डॉ. महादेव देशमुख डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. प्रशांत पाटील उपस्थित होते.

2 4 AUG 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडामहर्षी नागेशकर चषकाचे न्यू कॉलेज सातव्यांदा मानकरी

▪ कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडून कौतुकोद्गार



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील व क्रीडापटू व सहकारी. सोबत प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील आदी.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात ग्रामीण भागातून आलेले क्रीडापटू अतिशय कष्ट आणि संघर्षातून आपली कारकीर्द घडवित आहेत. त्यांच्यामुळेच विद्यापीठाचा लौकिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये वाढत आहे. न्यू कॉलेजने सलग सातव्या वर्षी क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर फिरता चषक, कायमस्वरुपी चषक, प्रमाणपत्र आणि रोख ५० हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले, असे कौतुकोद्गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२३–२४ साठीच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्कारांचे वितरणप्रसंगी ते बोलत होते. न्यू कॉलेजने सर्वाधिक १ हजार ५२ गुणांनी प्रथम क्रमांक पटकावला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठात व संलग्नित महाविद्यालयांत विद्यार्थी–विद्यार्थिनी खेडापाड्यांतून येतात. क्रीडा क्षेत्रात कारकीर्द घडविण्यासाठी अव्याहत कष्ट करतात. त्यांना विविध स्पर्धांमध्ये मिळणारे यश त्यांच्या कष्ट, संघर्षाचे फलित आहे. या विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा प्रदान करण्यासाठी विद्यापीठ सातत्याने प्रयत्नशील आहे. कोल्हापूर येथील शहाजी छत्रपती महाविद्यालयाने ६३४ गुण प्राप्त करीत द्वितिय क्रमांकाचा चषक, प्रमाणपत्र आणि रोख २५ हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले. तर, गडहिंग्लज येथील शिवराज महाविद्यालय साहित्य, वाणिज्य आणि डी.एस. कदम विज्ञान महाविद्यालयाने ५२४ गुणांसह तृतीय क्रमांकाचा चषक, प्रमाणपत्र आणि रोख १५ हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. अनिल कुराडे यांनी अनुक्रमे तिन्ही क्रमांकाच्या पारितोषिकांचा स्वीकार केला.

विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. एन.डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. किरण पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता उपस्थित होते.

### यंदापासून पारितोषिकाच्या व्याप्तीत वाढ

गतवर्षीपर्यंत क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पारितोषिक हे केवळ एकाच महाविद्यालयाला देण्यात येत असे. या संदर्भात अनेक महाविद्यालयांच्या मतानुसार विद्यापीठाच्या अधिकार मंडळांसमोर प्रस्ताव मांडला. त्यानुसार व्यवस्थापन परिषदेने पारितोषिकाची व्याप्ती या वर्षापासून वाढविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, फिरत्या चषकासोबतच कायमस्वरुपी चषक, प्रमाणपत्र आणि अनुक्रमे ५० हजार, २५ हजार आणि १५ हजार रुपये रोख पारितोषिके देण्याचा निर्णय घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 4 AUG 2025

पुण्यनगरी

# सहकारी ज्ञान व्यवस्थापनाद्वारे पर्यावरण संरक्षण आवश्यक : गाडगीळ

**कोल्हापूर :** सहकारी ज्ञान व्यवस्थापनाद्वारे पर्यावरणाचे संरक्षण आवश्यक आहे. त्यासाठी सार्वत्रिक प्रयत्नांची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र व निसर्ग व मानवी संरक्षणासाठी मोहीम यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते ऑनलाईन बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते.

या दोन दिवसीय परिसंवादामधील विविध सत्रांमध्ये डॉ. भारत पाटणकर, एस. आर हिरेमठ, प्रदीप चव्हाण, विजय एदलाबादकर, सचिंद्र लेले, संपत देसाई, अविनाश भाले, अमोल वाघमारे, किरण लोहकरे, शैलश सावंत, नूतन माळवी आणि सुभाष डोळस यांनी विविध विषयांवर मांडणी केली. परिसंवादाचा समारोप धैर्यशील पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 AUG 2025
लोकमत

# विद्यापीठात जी. डी. लाड अध्यासनाचा उद्या प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. लाड अध्यासन स्थापन करण्यात येत असून त्यानिमित्त उद्या सोमवारी विशेष व्याख्यान आणि शाहिरी सादरीकरण होणार आहे. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी ही माहिती दिली आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ११:३० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील.